**डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र. सीसीआर-१४१०/प्र.क्र.१०३०/२-स,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १९ ऑक्टोबर, २०११.

**वाचा :-**
1) क्रमांक : सीसीआर-१४९९/प्र.क्र.१३५/२-स, दिनांक २६ एप्रिल, १९९९ व शासन शुध्दिपत्रक दिनांक २८ जानेवारी, २०००.
2) शासन निर्णय क्र. सीसीआर-१४०७/प्र.क्र.२१५/२-स, दि. ११ जून, २००७.
3) म.स.स. अधिनियम-१९६० चे कलम ७९(अ) अन्वये शासनाचे निर्देश पत्र क्र. सीसीआर-१४०७/प्र.क्र.२१५/२-स, दि. १८ जून, २००७.
4) शासन निर्णय क्र. सीसीआर-१४१०/प्र.क्र.१०३०/२-स, दि. २८ जून, २०१०.

**प्रस्तावना :-**

"डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना" ही पीक उत्पादन प्रोत्साहन योजना राज्यात यापूर्वीच अंमलात आणण्यात आली असून, या योजनेनुसार सध्या त्रिस्तरीय सहकारी पतसंरचनेकडून रु. ३ लाखापर्यंत अल्प मुदत पीक कर्जाची उचल करुन विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- पर्यंतच्या कर्जावर ४% व्याज सवलत व त्यापुढील रु. ३ लाखपर्यंतच्या कर्जावर २% व्याज सवलत देण्यात येते. तथापि रु. ३ लाखपर्यंत अल्पमुदत कर्जाची नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने व्याज सवलतीचा दर वर्ष २०११-१२ पासून २% ऐवजी ३% करण्याचे धोरण जाहिर केलेले आहे. कर्जावरील व्याजाचा दर व व्याज सवलतीचा दर यात सुसंगतता असली पाहिजे ही बाब विचारात घेऊन या योजनेअंतर्गत व्याज सवलतीत सुधारणा करणे व कर्ज मर्यादेची व्याप्ती वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने "डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना" ही पीक उत्पादन प्रोत्साहन योजना संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे राज्यामध्ये अंमलात आणण्यात आलेली आहे. सदर योजनेचा अधिकाधिक शेतकऱ्यांना फायदा होण्याच्या अनुषंगाने या योजनेची व्याप्ती अधिक वाढविण्यास या शासन निर्णयाद्वारे पुढील प्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

१) या योजनेनुसार त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणा, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका व खाजगी बँकांकडून रु. १ लाखपर्यंतचे अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या आणि विहित मुदतीत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ३% वार्षिक दराने व्याजाची सवलत लागू करण्यात येत आहे.

२) या योजनेनुसार त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणा, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका व खाजगी बँकाकडून रु. १ लाखापेक्षा जास्त पण रु. ३ लाखापर्यंतचे अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या आणि विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २% वार्षिक दराने व्याजाची सवलत लागू करण्यात येत आहे.

३) उपरोक्त १ व २ मध्ये नमूद केल्यानुसार शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्प मुदत पीक कर्जाची परतफेड प्रत्येक वर्षी दिनांक ३० जूनपर्यंत केल्यास ते या योजनेअंतर्गत सवलत घेण्यास पात्र राहतील.

४) डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना या सुधारीत योजनेचा लाभ सन २०११-१२ या हंगामापासून अल्प मुदत पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येईल.

५) या योजनेवरील खर्चासाठी प्रत्येक आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी १% इतकी रक्कम या योजनेच्या प्रचार, प्रसार व प्रसिध्दी या बाबींवरील खर्चासाठी उपयोगात आणण्यात येईल. यासंबंधिच्या मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२. अशाप्रकारे उपरोक्त योजनेचे अधिक स्पष्टीकरण देण्याच्या दृष्टीने रु. ३ लाखापर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना रु. १ लाखापर्यंत ३% व्याज सवलत व त्यापुढील कर्जाकरिता २% व्याजाची सवलत लागू करण्यात येत आहे.

३) सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १३५/११/विघयो-१ दिनांक १९/९/२०११ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४८२/व्यय-२ दिनांक २३/९/२०११ अन्वये प्राप्त मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१११०१९१६१०२८००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( एस. बी. पाटील )**
**सह सचिव तथा वि.का.अ.(सहकार)**

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. सहसचिव, भारत सरकार, कृषि मंत्रालय( सहकार विभाग ) कृषी भवन, नवी दिल्ली.

३. मुख्य अधिकारी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ॲग्रीकल्चर क्रेडिट डिपार्टमेंट,गारमेट हाऊस,मुंबई.
४. जिल्हाधिकारी, (सर्व).
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
७. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
८. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मर्या. मुंबई.
११. सर्व व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.
१२. सर्व लीड बँक ऑफीसर.
१३. उपमहाव्यवस्थापक(नियोजन व सदस्य सचिव), राज्य स्तरीय बँकर्स कमिटी, महाराष्ट्र, महाराष्ट्र बँक, पुणे.
१४. महालेखापाल -१(लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई (३ प्रती).
१५. महालेखापाल -२(लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, नागपूर (३ प्रती).
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालास, मंत्रालय, मुंबई.
१७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर. मुंबई
१८. नियोजन विभाग (१४११ व १४६३ ), मंत्रालय, मुंबई.
१९. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई-३२.
२०. कक्ष अधिकारी (१७-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२१. निवड नस्ती (२-स).